स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## राष्ट्रीय सेवा योजना

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

प्रो. (डॉ.) सदानंद भोसले
एम्.ए., पीएच् डी.
संचालक (अतिरिक्त कार्यभार)

कार्यालय क्र. : ०२०–२५६२२६८८/८९
: ०२०–२५६२२६९०/९१
: ०२०–२५६२२६९२
: ०२०–२५६९७३४१

रासेयो/२०२३–२४/५८१ दि. ०९/०१/२०२४

**प्रति,**
**मा. प्राचार्य, सर्व संलग्नीत महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था**
**पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा**
**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**

**विषय : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अमृत महोत्सवी वर्षानिमित्त जिल्हानिहाय व विद्यापीठस्तरावर काव्यसंमेलन स्पर्धेचे आयोजन करण्याबाबत**

महोदय/महोदया,

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त कलागुणांना वाव देण्यासाठी, मा. कुलगुरू घठित अनुदान वाटप समितीच्या बैठकीतील शिफारसीनुसार पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्ह्यातील रासेयो संलग्नीत महाविद्यालयातील विद्यार्थी स्वयंसेवकांकरिता देशभक्तीपर व पर्यावरण विषयांवर आधारित मराठी, हिंदी व इंग्रजी भाषांमध्ये स्वरचित काव्यसंमेलन स्पर्धा जिल्हानिहाय पद्धतीने व विद्यापीठस्तरावर आयोजित करण्यात येणार आहे.

पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ याठिकाणी माहे जानेवारी/फेब्रुवारी २०२४ मध्ये स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार आहे. मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेतील स्वरचित काव्यांमध्ये प्राविण्य असलेल्या आपल्या महाविद्यालयातील निवडक स्वयंसेवकांस स्पर्धेकरिता जिल्हानिहाय आयोजक महाविद्यालयांमध्ये पाठवण्यात यावे. जिल्हानिहाय स्पर्धेतील मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेतील प्रथम पाच क्रमांकास दि. १६ फेब्रुवारी, २०२४ रोजी विद्यापीठस्तरावरील स्पर्धेत सहभागी होणे अनिवार्य आहे. संपूर्ण स्पर्धेची अधिक तपशीलवार माहिती पुढीलप्रमाणे.

| **मराठी, हिंदी व इंग्रजी स्वरचित काव्यसंमेलन (जिल्हानिहाय)** | | | |
|---|---|---|---|
| **क्र.** | **स्पर्धा** | **विषय** | **नियमावली** |
| १ | काव्य संमेलन | देशभक्तीपर व पर्यावरणपूरक विषयांवर | **सहभागी :** २ विद्यार्थी<br>**भाषा :** मराठी, हिंदी व इंग्रजी<br>**वेळ :** ३+२ मिनीटे<br>**आशय :** कवितेमध्ये नवीन आशयाचा संदेश असावा, कविता स्वरचित असावी. सादरणीकरणापूर्वी स्वाक्षरी सह एक प्रत आयोजकांकडे सादर करणे आवश्यक आहे. |

वरीलप्रमाणे स्पर्धांचे जिल्हानिहाय पद्धतीने आयोजन करताना पुढील वेळापत्रकानुसार कार्यवाही करण्यात यावी व त्याबाबत स्वयंसेवकांना सूचित करण्यात यावे.

| **जिल्हानिहाय स्पर्धेकरिता पुढील वेळापत्रकानुसार महाविद्यालयांना सूचित करण्यात यावे.** | | |
|---|---|---|
| **क्र.** | **दिनांक** | **तपशील** |
| १ | २६ जानेवारी, २०२४ | **प्रजासत्ताकदिन कार्यक्रमाच्या वेळी मा. प्राचार्य यांनी सर्व स्वयंसेवकांना वरीलप्रमाणे स्पर्धेकरिता महाविद्यालयस्तरावर स्पर्धांमध्ये सहभागी होण्याबाबत आवाहन करण्यात यावे.** |
| २ | २७ ते ३१ जानेवारी, २०२४ | **महाविद्यालयांनी महाविद्यालयस्तरावर वरीलप्रमाणे स्पर्धेचे आयोजन करावे. काव्यसंमेलन स्पर्धेकरिता महाविद्यालयातील किमान ५ स्पर्धक सहभागी होणे आवश्यक आहे, यामधून प्रथम क्रमांकाची निवड करावी. निवड झालेल्या स्वयंसेवकांची माहिती https://forms.gle/6zt9ToGXxtzsMsx36 या गुगल लिंकमध्ये दिनांक २ फेब्रुवारी २०२४ पूर्वी कार्यक्रम अधिकाऱ्यांमार्फतच अनिवार्यपणे भरण्यात यावी व सदर स्पर्धकांस पुढील तपशिलानुसार जिल्हानिहाय स्पर्धेकरिता पाठवण्यात यावे. नावनोंदणी केली नसल्यास जिल्हानिहाय स्पर्धेकरिता सहभागी होता येणार नाही.** |

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रो. (डॉ.) सदानंद भोसले
एम्.ए., पीएच् डी.
संचालक (अतिरिक्त कार्यभार)

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## राष्ट्रीय सेवा योजना
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

कार्यालय क्र. : ०२०–२५६२२६८८/८९
: ०२०–२५६२२६९०/९१
: ०२०–२५६२२६९२
: ०२०–२५६९७३४१

**जिल्हानिहाय स्पर्धा वेळापत्रक**

| क्र. | विभाग व दिनांक | आयोजक महाविद्यालयाचे नाव | स्पर्धा समन्वयक अधिकारी नाव व संपर्क |
|---|---|---|---|
| १ | **पुणे शहर** ६/०२/२०२४ **स. १०.०० वा.** | महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे आबासाहेब गरवारे महाविद्यालय, कर्वे रोड, पुणे | डॉ. वर्षा तोडरमल विभागप्रमुख, मराठी विभाग ९०९६९५१२०० |
| २ | **पुणे ग्रामीण** ०६/०२/२०२४ **स. १०.०० वा.** | रयत शिक्षण संस्था एस.एम.जोशी महाविद्यालय, हडपसर पुणे | डॉ. दिनकर मुरकुटे कार्यक्रम अधिकारी ९३२५२८९१३१ |
| ३ | **अहमदनगर** ०७/०२/२०२४ **स. १०.०० वा.** | कोपरगाव तालुका एज्युकेशन सोसायटीचे के. जे. सोमय्या कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, कोपरगाव, अहमदनगर | डॉ. गायकवाड बाळू कार्यक्रम अधिकारी ९८२२८१७६३६ |
| ४ | **नाशिक** ०७/०२/२०२४ **स. १०.०० वा.** | मराठा विद्या प्रसारक समाज सी.एस.एम.एस. महाविद्यालय, नाशिक | डॉ. उदय चौधरी कार्यक्रम अधिकारी ७५८८५५१८३७ |
| आयोजक महाविद्यालयांनी जिल्हानिहाय स्पर्धेतील मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेतील प्रथम पाच विजेत्या स्पर्धकांना विद्यापीठस्तरीय स्पर्धेत सहभागी होण्याकरिता पुढील तपशिलानुसार पाठवण्यात यावे. | | | |
| १ | **दि. १६ फेब्रुवारी, २०२४ स. १०.०० वा.** | संत नामदेव सभागृह, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ | राष्ट्रीय सेवा योजना कार्यालय सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ ०२०–२५६२२६८८,८९,९०,९१ |

**विद्यापीठस्तरीय काव्यसंमेलन विषय** : देशभक्तीपर व पर्यावरणपूरक
**सहभागी** : जिल्हास्तरीय स्पर्धेतील विजेते (मराठी भाषा : प्रथम पाच, हिंदी भाषा : प्रथम पाच, हिंदी भाषा : प्रथम पाच) एकूण ४ विभाग, असे एकूण ६० स्पर्धक
**भाषा** : मराठी, हिंदी व इंग्रजी, **वेळ** : ३+२ मिनीटे, **आशय** : कवितेमध्ये नवीन आशयाचा संदेश असावा, कविता स्वरचित असावी. सादरणीकरणापूर्वी स्वाक्षरीसह एक प्रत आयोजकांकडे सादर करणे आवश्यक आहे.

तरी वरीलप्रमाणे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त विद्यार्थ्यांकरिता मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेतील जिल्हास्तरीय व विद्यापीठस्तरावर सहभागी होण्याकरिता आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थी पाठवण्यात यावेत. जिल्हा व विद्यापीठस्तरीय स्पर्धेत सहभागी स्वयंसेवक यांचा प्रवासखर्च नियमित कार्यक्रमातून करण्यात यावा. कळावे, ही विनंती.

**संचालक**
**राष्ट्रीय सेवा योजना**

*१. गुगल लिंकद्वारे माहिती फक्त कार्यक्रम अधिकाऱ्यांनीच भरावी. अन्यथा प्रवेशिका रद्द करण्यात येईल.*